महाराष्ट्र शासन

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर
# Rajarhsee Chatrapati Shahu Maharaj Government Medical College, Kolahpur

दूरध्वनी-०२३१-२६४५२७ E-Mail-rcsmlib@yahoo.in

जा.क्र.राछशामशावैमको/पीजी विभाग / ३७ /२०२६ दि. 05/०१/२०२६

## पी.जी.डी.एम.टी. अभ्यासक्रम- प्रवेश अधिसूचना

राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर येथे **पी.जी.डी.एम.एल.टी.** या अभ्यासक्रमासाठी **सन २०२५-२०२६** या शैक्षणिक वर्षाकरीता विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रवेश अर्ज दिनांक :- **०७ जानेवारी २०२६ ते दिनांक :- १६ जानेवारी २०२६** पर्यंत शासकिय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन कामकाजा दिवशी **सकाळी १०.०० ते सायं ५.००** पर्यंत अधिष्ठाता, राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडापार्क, कोल्हापूर यांच्या कार्यालयात खुल्या, एस.ई.बी.सी. व इ.डब्लू.एस. प्रवार्गासाठी **रुपये २००/- (रु. दोनशे फक्त)** व मागासवर्गीयांसाठी रुपये १५०/- **( रु. एकशे पन्नास फक्त)** इतके शुल्क भरून मिळतील. प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख **दिनांक :- १६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** राहील.

तसेच अधिष्ठाता कार्यालय, राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर येथे **दिनांक:- २० जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत** अर्ज सादर केलेल्या उमेद्वारांनी मुळ प्रमाणपत्रे पडताळणी करण्याकरिता उपस्थित राहावे. मुळ प्रमाणपत्रे पडताळणीसाठी हजर राहण्याकरीता अर्जदारांना स्वतंत्रपणे पत्राने कळविले जाणार नाही. अर्जदारांनी मुळ प्रमाणपत्रे घेऊन स्वखर्चाने हजर राहणेचे आहे. मुळ प्रमाणपत्रे पडताळणीकरिता येणाऱ्या अर्जदारांना कोणत्याही प्रकारचा वाहनखर्च/प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

**आरक्षणाच्या लाभार्थ्यांना सुचना करण्यात येते की, मूळ जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र तसेच आवश्यक असल्यास नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र पडताळणीवेळी असणे अत्यावश्यक आहे. अन्यथा सदर उमेद्वारास संबंधित लाभ मिळणार नाही. तसेच मूळ प्रमाणपत्र नसल्यास कोणतेही कारण विचारात घेतले जाणार नाही.**

**शैक्षणिक पात्रता :-**

- पी.जी.डी.एम.एल.टी. अभ्यासक्रमासाठी संबंधित उमेदवार हा मान्यता प्राप्त विद्यापीठाकडून केमिस्ट्री, बायोकेमिस्ट्री, मायक्रोबायोलॉजी, बॉटनी,झुलॉजी, बायोटेक्नोलॉजी आणि लाईफ सायन्येस यापैकी मुख्य विषयासह बी.एस्सी. (B.Sc.)/B.Sc (Medical Laboratory Technology) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.किंवा आरोग्य विज्ञान विषयक पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**पी.जी. डि.एम.एल.टी अभ्यासक्रमासाठी उपलब्ध जागा:-**

| अ. क्र | अभ्यासक्रम | अभ्यासक्रमाच्या एकूण जागा | मागासवर्गीय प्रर्वगासाठी जागा | | | | | | | ई.डब्ल्यू. एस. | एस.ई.बी.सी. | खुल्या जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एस.सी. | एस.टी. | व्ही.जे. | एन.टी१ NT-B | एन.टी२ NT-C | एन.टी३ NT-D | ओ.बी.सी. | | | |
| १ | पी.जी. डिएमएलटी | २० | ३ | १ | १ | १ | ० | ० | ४ | २ | २ | ६ |

पी.जी.डि.एम.एल.टी अभ्यासक्रमासाठी निवड प्रक्रिया व निवड यादी बाबतची अद्यावत माहिती तसेच अटी व शर्ती महाविद्यालयाच्या नोटीस बोर्ड तसेच www.rcsmgmc.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

R.C.S.M. Govt. Medical College • Kolhapur •

(डॉ. एस.एस. भिसे)
अधिष्ठाता,
राजर्षि छत्रपती शाहू महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर.

## <u>निवड प्रक्रिया व निवड यादीबाबतची माहिती</u> :-

मुळप्रमाणपत्रे पडताळणीनंतर प्रथम निवड यादी **दिनांक :- २३/०१/२०२६** रोजी कार्यालयाच्या सुचना फलक तसेच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार प्रथम निवड यादीतील सर्व संबंधित उमेद्वारांनी दिनांक :- **२७/०१/२०२६** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महाविद्यालयात शैक्षणिक शुल्क व मूळ प्रमाणपत्रे जमा करुन आपला प्रवेश घेणे अनिवार्य राहील. प्रथम निवड यादीतील उमेद्वारांनी **दिनांक :- २७/०१/२०२६** पर्यंत प्रवेश न घेतल्यास सदर जागेवर त्यांचा प्रवेशहक्क राहणार नाही.

रिक्त राहिलेल्या जागांसाठी **दिनांक :- २८/०१/२०२६** रोजी दुसरी निवड यादी कार्यालयाच्या सुचना फलक तसेच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार दुसऱ्या निवड यादीतील सर्व संबंधित उमेद्वारांनी दिनांक :- **३०/०१/२०२६** रोजी सायंकाळी ५.००वाजेपर्यंत महाविद्यालयात शैक्षणिक शुल्क व मूळ प्रमाणपत्रे जमा करुन आपला प्रवेश घेणे अनिवार्य राहील. दुसऱ्या निवड यादीतील उमेद्वारांनी दिनांक **३०/०१/२०२६** पर्यंत प्रवेश न घेतल्यास सदर जागेवर त्यांचा प्रवेशहक्क राहणार नाही.

## <u>पी.जी.डी.एम.एल.टी. अभ्यासक्रमासाठी अटी व शर्ती</u> :-

१) मा.कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक हे उपरोक्त विषयास या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची पात्रता निश्चित करतील.

२) पी.जी.डी.एम.एल.टी. अभ्यासक्रमाचा कालावधी हा **<u>एक वर्षाचा (१२ महिने)</u>** आहे.

३) उशिरा आलेल्या तसेच अपूर्ण असलेल्या अथवा डाकद्वारे पाठविण्यात आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

४) निवड झालेल्या उमेदवारानी त्यांचा प्रशिक्षणाच्या कालावधीत संबंधित संस्थेमध्ये पूर्ण वेळ उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५) विद्यापीठ नोंदणी व पात्रता तसेच परिक्षा शुल्क विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे विद्यापीठास भरावे लागेल.

६) आरक्षणातून प्रवेश घेण्यासाठी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र तसेच लागू असल्यास नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र अर्जासोबतच सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचा प्रवेश आरक्षणातून होणार नाही.

७) खुल्या व मागासवर्गीयांसाठी पीजी डिएमएलटी अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाचे एकूण शुल्क रु. <u>७१७००/-</u> असून <u>अनामत रक्कम रु. २०००/-</u>(परतावा रक्कम) शासनाच्या नियमाप्रमाणे भरावे लागेल.

८) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.

९) निवड झालेल्या विद्यार्थ्यीनीस/ विद्यार्थ्यांस या महाविद्यालयात <u>वसतीगृह उपलब्ध नाही.</u>

१०) निवड प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार मा. अधिष्ठाता, राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांनी राखीव ठेवलेले आहेत.

R.C.S.M. Govt. Medical College Kolhapur

(डॉ. एस.एस.भिसे)
अधिष्ठाता,
राजर्षि छत्रपती शाहू महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर.

- अर्जदारांनी खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१) बी.एस.स्सी. भाग १,२,३ परिक्षेच्या गुणपत्रिका.

२) बी.एस.स्सी. भाग १,२,३ परीक्षेतील प्रयत्न (Attempt) प्रमाणपत्र.

३) बी.एस.स्सी. पासिंग किंवा उत्तीर्णता प्रमाणपत्र.

४) बी.एस. स्सी. पदवी प्रमाणपत्र.

५) एस.एस.सी. (S.S.C) गुणपत्रक व प्रमाणपत्र.

६) एच.एस.सी. (H.S.C) गुणपत्रक व प्रमाणपत्र.

७) जात प्रमाणपत्र.

८) जात वैधता प्रमाणपत्र.

९) दि. ३१/०३/२०२६ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (एस.ई.बी.सी., व्ही.जे, एन.टी.१,२,३, ओ.बी.सी. including एस.बी.सी. प्रवर्गातील उमेद्वारांनी अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.)

१०) ई.डब्लू.एस. प्रवर्गातील उमेद्वारांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ चे ई.डब्लू.एस. प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

११) कॉलेज लिव्हींग प्रमाणपत्र.

१२) विद्यापीठ मायग्रेशन प्रमाणपत्र.

१३) राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र व महाराष्ट्र रहिवासी प्रमाणपत्र.

१४) नाव बदलेले असल्यास राजपत्राची प्रत व विवाह प्रमाणपत्र.

१५) शैक्षणिक खंड प्रमाणपत्र (Gap Certificate)

R.C.S.M. Govt. Medical College Kolhapur

# शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी पी.जी. डी.एम.एल. टी. अभ्यासक्रमासाठी शुल्क

| महाविद्यालयाचे शुल्क | | |
|---|---|---|
| ना - परतावा | | |
| अं.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
| १. | प्रवेश शुल्क | १५०० |
| २. | शैक्षणिक शुल्क | ६८७०० |
| ३. | ग्रंथालय शुल्क | १००० |
| ४. | जिमखाना शुल्क | ५०० |
| | **एकुण शुल्क** | ७१७०० |
| **परतावा** | | |
| १. | ग्रंथालय अनामत | २००० |

R.C.S.M. Govt. Medical College * Kolhapur *

DEAN,
R.C.S.M. Govt. Medical College
Kolhapur.